सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ

यांचे कार्यालय

कार्यालय - कुडाळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

---

## राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 कसाल ते झाराप

(कि.मी.419/800 To 450/170)

# :: भूसंपादन निवाडा ::

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 (1956 चा कायदा 48) कलम 3G (1)

अन्वये नुकसान भरपाई आदेश

## भूसंपादन प्रकरण क्रमांक 2/2014

| | |
|---|---|
| मुल्यांकन दिनांक | :- सन 2015 |
| आदेश दिनांक | :- 30/11/2016 |
| गावाचे नांव | :- रानबांबुळी |
| तालुका | :- कुडाळ |
| जिल्हा | :- सिंधुदुर्ग |

**वाचले :-**

1) प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (सडक परिवहन व राज्यमार्ग मत्रालय भारत सरकार) यांजकडील पत्रान्वये राष्ट्रीय महामार्ग क्र.17 राजापूर ते झाराप (NH-66) कि.मी. 351.00 ते 450.170 विस्तारीत करण्यासाठी व नामनिर्देशन करणेसाठीचे पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे पत्र.क्र. 16026/140/2013-COLL-REV दि.19/09/2013 नुसार भूसंपादन प्रक्रिया पार पाडण्याकरिता उपविभागीय अधिकारी (महसूल) कुडाळ यांचे नामनिर्देशन अधिसूचीत करणेसाठी कळविणेत आले होते. त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 कलम 3(a) अन्वये राज्यमार्ग व सडक परिवहन विभाग भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडील क्र. का.आ.39(अ)अधिसूचना प्रसिद्ध दिनांक 7 जानेवारी 2014 अन्वये राष्ट्रीय महामार्ग 17 (नविन-66) करिता उपविभागीय अधिकारी (महसूल) कुडाळ यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नेमणूक केली आहे.
2) कार्यकारी अभियंता, दक्षिण सा.बा.विभाग, रत्नागिरी यांचेकडील पत्र क्रमांक जावक क्र.दरवि/प्रशा/चौप./भूसंपादन/476, दि.24/02/2014 अन्वये मौजे-रानबांबुळी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग जमीन संपादनाबाबतचा प्रस्ताव.
3) राजमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग भारत सरकार, नवी दिल्ली राजपत्र असाधारण भाग II खंड 3 - उपखंड (ii) अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(A) अधिसूचना का.आ.3186 (अ) प्रसिद्धी दिनांक 26/11/2015.
4) सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली राजपत्र असाधारण भाग II खंड 3 - उपखंड (ii) अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(D) अधिसूचना का.आ.2067(अ) प्रसिद्ध दिनांक 10/06/2016.
5) मौजे- रानबांबुळी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील उपअधिक्षक भूमि अभिलेख, कुडाळ यांजकडील संयुक्त मोजणी पत्रक मो.र.नं.135, दि.27/03/2015.
6) उपवन संरक्षक वनविभाग, सावंतवाडी / वनक्षेत्रपाल, कडावल यांजकडील क्रमांक/ब/मुल्यां/209/16-17, दि.14/07/2016 संपादित जमिनीवरील वनझाडे मुल्यांकन अहवाल.
7) उपविभागीय कृषि अधिकारी, सावंतवाडी यांजकडील पत्र जा.क्र./उविकृसा/तंत्र/मुल्यांकन-66/1410/2016, दि.13/07/2016 अन्वये संपादित जमिनीवरील फळझाडे मुल्यांकन अहवाल.
8) उपसचिव महाराष्ट्र शासन यांजकडील पत्र क्र.संकीर्ण-10/2015/प्र.क्र.133/अ-2 महसूल व वनविभाग, दि.05/10/2015.

9) कलम 3(A) नुसार अधिसूचना प्रसिध्दी राजपत्र दि.26/11/2015 व दैनिक तरुण भारत व दैनिक पुढारी वृत्तपत्र दि.18/12/2015.

10) कलम 3 C नुसार प्राप्त हरकतींच्या अनुषंगाने आक्षेप अर्जावर सुनावणी दि.28/01/2016.

11) भारतीय राजमार्ग प्राधिकरण नवी दिल्ली यांचे पत्र क्र.NHAI/110/03/dmg (L.A.& Coord)2015/FTS-417/70689, दि.24/08/2015.

12) क्र.एल.क्यू.एन/12/2013 प्र.क्र.190/अ2 ज्या अर्थी भूमिसंपादन, पुनवर्सन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 (2013 चा 30) महसूल व वनविभाग मुंबई अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 4 अ मधील असाधारण क्रमांक 70, दि. 25 मे, 2015.

13) भारत सरकार यांजकडील पत्र क्र.13011/04/2015-LRD, दि.09/02/2016

14) भारत सरकार, Ministry Of Road Transport and Highway यांजकडील पत्र क्र.RW/MUM- 11016/1/2015-16/684, दि.13/04/2016.

15) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचेकडील पत्र क्र.संकिर्ण-03/2016/सं.क्र-270/अ-2, दि.28 ऑक्टोंबर, 2016.

भारत सरकार साठी करावयाच्या भूसंपादना करिता राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे (1956 चा कायदा 48) कलम 3G अन्वये डॉ. विकास सुर्यवंशी, उपविभागीय अधिकारी (महसूल) कुडाळ यांनी तयार केलेला निवाडा.

**भूसंपादन निवाडा**

क्र.उविअ/रा.म.मा.66/भूसं.एसआर नं.2/रानबांबुळी/2016
सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ, दिनांक : /11/2016.

**भारत सरकार साठी लागू असलेले भूसंपादन राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे (1956 चा कायदा 48) कलम 3G अन्वये निवाडा**

**विषय :- भूसंपादन जिल्हा सिंधुदुर्ग.**
**भारतीय राष्ट्रीय राजमार्ग क्र.66 चौपदरीकरणासाठी भूसंपादन**
**मौजे रानबांबुळी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.**

**1) भूसंपादन प्रस्ताव :-**

प्रस्तुत प्रकरणी संपादन संस्था कार्यकारी अभियंता, दक्षिण सा.बां.विभाग, रत्नागिरी असून, भूसंपादन मोबदला निधी न्यायालय खर्च तसेच तदअनुषंगीक इतर सर्व खर्च देणेसाठी संपादन संस्था म्हणून कार्यकारी अभियंता, दक्षिण सा.बां.विभाग, रत्नागिरी यांचेवर बंधनकारक होईल.

## 1) कलम 3 (a) अधिसूचना :-

राष्ट्रीय महामार्ग क्र.66 राजापुर ते झाराप (किमी-351/000 ते 450/170) विस्तारीत करण्यासाठी नामनिर्देशन करणेसाठी मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे पत्र.क्र. 16026/140/2013-COLL-REV दि.19/09/2013 अन्वये भूसंपादन प्रक्रिया पार पाडण्याकरीता उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांचे नामनिर्देशन अधिसूचीत करणेसाठी कळविणेत आले होते. त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 कलम 3(a) अन्वये राज्यमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडील क्र. का.आ.39 (अ) अधिसूचना प्रसिद्धी दिनांक 07/01/2014 अन्वये राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 करीता उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नेमणूक केली आहे.

## 2) सक्षम प्राधिकारी :-

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांजकडील पत्रान्वये राष्ट्रीय महामार्ग क्र. 66 (जुना 17) राजापूर ते झाराप (कि.मी. 351/000 ते 450/170) हद्दी मधील मौजे कसाल ते झाराप तालुका कुडाळ पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण, चौपदरीकरण करणेसाठी भूसंपादन प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांना प्राधिकृत केलेले आहे.

## 3) प्रस्ताव :-

कार्यकारी अभियंता दक्षिण सा.बां.विभाग, रत्नागिरी यांचेकडील पत्रक जावक क्र.दरवि/प्रशा/चौप./भूसंपादन/476, दि.24/02/2014 अन्वये राष्ट्रीय महामार्ग क्र.66 च्या रूंदीकरणासाठी आवश्यक जमिनीचा मौजे रानबांबुळी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग या गावातील भूसंपादन प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

## 4) कलम 3 (A) अधिसूचना :-

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3 (A) अधिसूचना राजमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली राजपत्र असाधारण भाग II खंड 3 - उपखंड (ii) अन्वये का.आ. 3186 (अ) दिनांक 26/11/2015 रोजी प्रसिद्ध झाली आहे. सदर अधिसूचना सिंधुदुर्ग जिल्हातील दोन स्थानिक वृत्तपत्रात व शासकीय कार्यालयात खालीलप्रमाणे प्रसिद्ध करण्यात आली.

| अ.क्र. | वृत्तपत्र व प्रसिद्धी कार्यालयाचे नाव | प्रसिद्धीचा दिनांक |
|---|---|---|
| 1 | स्थानिक वृत्तपत्र दै.'तरुण भारत' | 18/12/2015 |
| 2 | स्थानिक वृत्तपत्र दै. 'प्रहार' | 18/12/2015 |
| 3 | उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ कार्यालय नोटीस बोर्डावर | 18/12/2015 |
| 4 | जिल्हाधिकारी कार्यालय नोटीस बोर्डावर | 19/12/2015 |
| 5 | तहसिल कार्यालय, कुडाळ नोटीस बोर्डावर | 19/12/2015 |
| 6 | तलाठी सजा पडवे नोटीस बोर्डवर | 19/12/2015 |
| 7 | ग्रामपंचायत कार्यालय रानबांबुळी नोटीस बोर्डावर | 19/12/2015 |
| 8 | संपादन संस्था कार्यालय नोटीस बोर्डावर | 19/12/2015 |

## 5) कलम 3 (C) नुसार चौकशी :-

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 (1956 चा कायदा 48) चे कलम 3 (A) (1) अन्वये प्राथमिक अधिसूचना दिनांक 26/11/2015 राजपत्रात व स्थानिक वर्तमानपत्रात दिनांक 18/12/2015 रोजी प्रसिद्ध झाल्यानंतर या अधिनियमाच्या कलम 3-C (1) अन्वये 21 दिवसांत जमिनधारक हितसंबंधित व्यक्तींनी हरकती दाखल करणेसाठी कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने हितसंबंधीतांनी हरकती उपस्थित केल्या त्यानुसार त्यांना त्यांचे म्हणने मांडण्यासाठी पुर्णपणे संधी देण्यात आली. व त्यांच्या हरकतींची दि.28/01/2016 रोजी सुनावणी करण्यात आली आहे. सुनावणी दरम्यानच भूसंपादनाच्या सर्व शंका व हरकती बद्दल सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांच्या स्तरावरून खातेदारांना इत्यंभूत माहिती देण्यात आली. सर्व हरकती व त्यावरील निर्णयाअंती राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 कलम 3D अन्वये कार्यवाही करण्यासाठी सविस्तर अहवाल कार्यकारी अभियंता दक्षिण सा.बां.विभाग, रत्नागिरी यांजकडे दि.31/03/2016 रोजी पाठविणेत आला.

## 6) कलम 3 (D) अधिसूचना :-

राजमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली राजपत्र असाधारण भाग II खंड 3 - उपखंड (ii) अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 कलम 3(D) अधिसूचना का.आ.2067(अ) प्रसिद्धी दिनांक 10/06/2016.

## 7) कलम 3 (D) नुसार अधिसूचना प्रसिद्धी :-

परिच्छेद 4 मध्ये नमूद केलेले अहवाल कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग रत्नागिरी यांनी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सडक परिवहन राज्यमार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3D नुसार अधिसूचना प्रसिद्ध करण्यासाठी अहवाल सादर केला. त्यानुसार राजमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली राजपत्र असाधारण भाग II खंड 3 - उपखंड (ii) अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(D) अधिसूचना का.आ.2067(अ), दि.10/06/2016 रोजी प्रसिद्ध केली. संयुक्त मोजणी पत्रकामध्ये दर्शविलेप्रमाणे **एकूण 0.86.10 हे.आर. क्षेत्र** प्रस्तावीत क्षेत्र असून, राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3D अधिसूचनेद्वारे **एकूण 0.86.10 हे.आर. क्षेत्र** अधिसूचित झालेले आहे. तथापि, नुकसान भरपाई दर निश्चित करणेसाठी कोणत्याही प्रकारची बाधा येत नाही. राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(D) अन्वये अधिसूचित करणेत आलेल्या व अंतिमरित्या संपादीत करावयाच्या जमिनीचा तपशिल सोबत परिशिष्ट-2 मध्ये देण्यात आला आहे. सदर अधिसूचना सिंधुदुर्ग जिल्हातील दोन स्थानिक वृत्तपत्रात व शासकीय कार्यालयात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

| अ.क्र. | वृत्तपत्र व प्रसिध्दी कार्यालयाचे नांव | प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|
| 1 | दैनिक 'प्रहार' (मराठी) | 25/07/2016 |
| 2 | दैनिक 'पुढारी' (मराठी) | 25/07/2016 |
| 3 | उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ कार्यालय नोटीस बोर्डावर | 10/08/2016 |
| 4 | जिल्हाधिकारी कार्यालय नोटीस बोर्डावर | 12/08/2016 |
| 5 | तहसिलदार कार्यालय,कुडाळ नोटीस बोर्डावर | 12/08/2016 |
| 6 | तलाठी कार्यालय, पडवे नोटीस बोर्डावर | 10/08/2016 |
| 7 | ग्रामपंचायत कार्यालय रानबांबुळी नोटीस बोर्डावर | 10/08/2016 |
| 8 | संपादन संस्था, कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, राष्ट्रीय महामार्ग रत्नागिरी | 12/08/2016 |

## 8) कलम 3 (G) 3 नोटीस व चौकशी :-

संपादित जमिनीत हितसंबंधित असणा-या सर्व हितसंबंधित व्यक्तींना उक्त दोन वृत्तपत्राद्वारे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3G पोट कलम 3 अन्वये हितसंबंधितांच्या असणा-या हक्कांचे स्वरुप व नुकसान भरपाई संदर्भातील त्यांच्या मागण्या संबंधीचे निवेदन घेवून दि.03/08/2016 रोजी उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांचे कार्यालयात उपस्थित रहाण्याबाबत नोटीस देण्यात आली होती. सदर तारखांना एकूण 3 हरकती/दावे प्राप्त झाले. हितसंबंधीत असांमीनी आपल्या निवेदनाद्वारे संपादनाखालील जमिनीची प्रतीआर दराबाबत मागणी देणेत आली. सदरच्या जमिनी हायवेलगत असल्याने व हायवेसाठी संपादन होत असल्याने हायवेवरील जमिनीला प्रतीआर रूपये दहा लाख प्रमाणे नुकसान भरपाई दर देणेत यावी. तथापी, सदर दराबाबत व मागण्याबाबत कोणताही लेखी पुरावा सादर केलेला नाही. सदर मागण्या पृष्ठयर्थ कोणत्याही प्रकारचा लेखी अगर तोंडी पुरावा सबंधीत खातेदार यांनी हजर केलेला नाही. सबब नियमानुसार कार्यवाही करण्यात येत असल्याचे विहित करून अर्ज निकाली करण्यात आले आहेत. त्यांच्या निवेदनातील मुद्यांवर सक्षम प्राधिकारी यांनी दि.03/08/2016 रोजी हरकतदारांच्या आक्षेप अर्जावर योग्य निर्णय घेणेत आलेला आहे.

## 9) संयुक्त मोजणी :-

राष्ट्रीय महामार्ग क्र.66 रस्ता रुंदीकरण मौजे - रानबांबुळी, ता. कुडाळ येथील भूसंपादन प्रस्तावातील जमिनीची संयुक्त मोजणी उपअधिक्षक, भूमि अभिलेख, कुडाळ व

संपादन संस्थेचे प्रतिनीधी यांनी केली आहे. सदर मोजणी नुसार मौजे - रानबांबुळी, ता.कुडाळ येथील **एकूण 0.86.10 हे.आर.** जमीन संपादित होत आहे. संयुक्त मोजणी पत्रक व नकाशाशीट या कार्यालयाकडे त्यांचेकडील पत्र क्रमांक भूमापन/ भूसंपादन/रा.म.मा.66/ 2016/750, दि.04/03/2016 अन्वये पुढील कार्यवाहीसाठी प्राप्त झालेला आहे. उपअधिक्षक भूमी अभिलेख, कुडाळ व संपादन संस्थेचे प्रतिनिधी यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे सर्वे नंबर / गट नंबर व क्षेत्र मान्य करण्यात आले आहे.

# परिशिष्ठ - अ

## भूसंपादन प्रस्ताव क्रमांक 2/2014, गांव - रानबांबुळी, तालुका - कुडाळ

| अ.नं. | कलम 3A नुसार प्रसिध्द झालेले क्षेत्र (हे.आर) | | कलम 3D नुसार प्रसिध्द झालेले क्षेत्र (हे.आर) | | संयुक्त मोजणी प्रमाणे क्षेत्र (हे.आर) | | सदरच्या निवाडयामध्ये समाविष्ठ करावयाचे क्षेत्र (हे.आर) | | अतिरिक्त प्रस्तावीत क्षेत्र (हे.आर) | | वगळावयाचे क्षेत्र (हे.आर) | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स.नं./हि.नं | क्षेत्र | स.नं./हि.नं | क्षेत्र | स.नं./हि.नं | क्षेत्र | स.नं./हि.नं | क्षेत्र | स.नं./हि.नं | क्षेत्र | स.नं./हि.नं | क्षेत्र | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1 | 147/2 पै | 0.18.30 | 147/2 पै | 0.18.30 | 147/2 पै | 0.18.30 | 147/2 पै | 0.18.30 | - | - | - | - | |
| 2 | 148/0 पै | 0.45.40 | 148/0 पै | 0.45.40 | 148/0 पै | 0.45.40 | 148/0 पै | 0.45.40 | - | - | - | - | |
| 3 | 149/1 | 0.00.30 | 149/1 | 0.00.30 | 149/1 | 0.00.30 | 149/1 | 0.00.30 | - | - | - | - | |
| 4 | 149/2 | 0.01.50 | 149/2 | 0.01.50 | 149/2 | 0.01.50 | 149/2 | 0.01.50 | - | - | - | - | |
| 5 | 150/2 पै | 0.11.80 | 150/2 पै | 0.11.80 | 150/2 पै | 0.11.80 | 150/2 पै | 0.11.80 | - | - | - | - | |
| 6 | 151/1 पै | 0.08.80 | 151/1 पै | 0.08.80 | 151/1 पै | 0.08.80 | 151/1 पै | 0.08.80 | - | - | - | - | |
| एकूण क्षेत्र | | **0.86.10** | - | **0.86.10** | - | **0.86.10** | - | **0.86.10** | - | - | - | - | |

1) वरील प्रपत्रातील 3(D) प्रमाणे संपादन करावयाचे स.नं./हि.नं. व क्षेत्र रकाना क्र.8 व 9 प्रमाणे आहे.
2) वरील प्रपत्रातील अतिरिक्त संपादन करावयाचे स.नं./हि.नं. व क्षेत्र रकाना क्र.10 व 11 प्रमाणे माहिती निरंक आहे.
3) वरील प्रपत्रातील वगळावयाचे स.नं./हि.नं. व क्षेत्र रकाना क्र. 12 व 13 प्रमाणे माहिती निरंक आहे.

वरील प्रपत्रातील रकाना 10 व 11 प्रमाणे अतिरिक्त प्रस्तावाद्वारे संपादित होत असलेल्या जमिनी व इतर बाबी दर्शविणारे विवरणपत्र माहिती निरंक आहे.

**परिशिष्ठ ब**

**कलम 3A व 3D प्रमाणे प्रसिद्ध करावयाच्या अतिरिक्त क्षेत्राचे विवरणपत्र.**

| अ.क्र. | गांव | स.नं./ हि.नं. | अतिरिक्त प्रस्तावाद्वारे देय होणारे क्षेत्र | हितसंबंधीत व्यक्तींचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| नि रं क | | | | | |

**( परिशिष्ठ-1 )**

| अ.क्र. | प्रस्ताव क्रमांक | गावाचे नांव | एकूण संपादीत क्षेत्र हे.आर. | | मोजणी रजिस्टर नं. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2/2014 | रानबांबुळी | खरीप | 0.13.60 | 135/2014 |
| | | | वरकस | 0.47.05 | |
| | | | पोट खराबा | 0.25.45 | |
| | | | **एकूण** | **0.86.10** | |

## 10) मालकी हक्क व स्थळ पहाणी : -

राष्ट्रीय महामार्ग क्र.66 कसाल ते झाराप हद्दीमधील मौजे रानबांबुळी, ता. कुडाळ रस्त्याचे रूंदीकरण, चौपदरीकरणासाठी कलम 3 (D) अधिसूचना, संयुक्त मोजणी अहवाल जायमोक्यावर स्थळपहाणी मौजे रानबांबुळी, ता. कुडाळ दि. 27/03/2015 रोजी करणेत आली. संपादित होणाऱ्या जमिनीची मालकी निश्चित करण्यासाठी संबंधीत जमिनीच्या अधिकार अभिलेखातील (7/12) नोंदी ग्राह्य धरण्यात आल्या आहेत. मालकी हक्क व नुकसान भरपाई बाबत हरकती निर्माण झाल्यास त्यावर राष्ट्रीय महामार्ग अधिनियम

1956 कलम 3 H (4) प्रमाणे कार्यवाही करणेत येईल. उक्त अधिनियमाचे कलम 3D व संयुक्त मोजणीचे वेळी मालकी हक्काबाबतचे दस्त ऐवज विचारात घेण्यात आले आहे. तथापी काही मालमत्ते संदर्भात मालकी हक्क शाबितीचा वाद उद्भवल्यास मालकी हक्काबाबत सक्षम न्यायालय जो आदेश देईल त्या आदेशानुसार नुकसान भरपाई वाटप करण्यात येईल.

**11) आक्षेप व मागण्या :-**

प्रस्ताव पाठविणाऱ्या संस्थेकडुन कुठल्याही प्रकारची मागणी किंवा आक्षेप नाही. तसेच बाधीत शेतकऱ्यांचे संयुक्त मोजणी संबंधी व जमिनीच्या मुल्याकंनासंबंधी सबळ पुराव्यासह राष्ट्रीय महामार्ग अधिनियम कलम 3A व 3G संदर्भाने एकही आक्षेप आला नाही. त्याअनुषंगाने मौजे रानबांबुळी, ता. कुडाळ येथील प्रकरणात या कार्यालयाने कलम 3G च्या आक्षेप सुनावणी घेण्याचा प्रश्न उद्भवला नाही. त्यावेळी व त्यानंतर कोणतेही सबळ पुरावे दाखल झाले नाहीत.

**12) बाजार मुल्य (Market Value) निश्चित करणे -**

राष्ट्रीय महामार्ग क्र.66 च्या रुंदीकरण/चौपदरीकरणासाठी लागणाऱ्या जमिनीचे भूसंपादन हे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 मधील तरतूदीप्रमाणे करणेत येत आहे. सदर संपादीत जमिन राष्ट्रीय राज्य महामार्ग क्र.66 (जूना 17) मुंबई ते गोवा रोडच्या लगत असल्याने रहिवास व्यापार व औद्योगीक दृष्टया महत्वाचे आहे. हायवेलगतच्या जमिनीचे महत्व रस्त्यावरील सोई सुविधा या दृष्टीकोनातून वाढत आहेत. संपादनाखालील सर्व जमिनी हायवेमार्गावरील व लगत असल्याने त्याचे मुल्यांकन निश्चित करताना हायवेमार्गालगतच्या जमिनीचे शेती, रहिवास, व्यापार, औद्योगीक वापर या दृष्टीकोनातून महत्व विचारात घेणे आवश्यक आहे. तसेच अधिकृत व संभाव्य बिनशेती क्षमता व 7/12 वरून खरीप, हंगामी बागायत व अकृषिक जमिनीबाबत इत्यादींचा विचार करणे आवश्यक आहे.

**13) जमिनीचे दर :-**

मौजे रानबांबुळी, ता.कुडाळ, जि.सिधुदुर्ग या गावचे शिघ्रसिद्ध गणक दर ग्रामिण क्षेत्रातील माहिती तक्त्यामध्ये सदरचा गांव मुल्यविभाग क्र.6 तपशीलाप्रमाणे मुल्यदर तक्त्यामध्ये शेतसारा हेक्टरी आकारणीनुसार (गटानुसार) प्रति हेक्टरी जिरायत शेत जमिनीचे दर दिलेले आहेत. खरीप अथवा वरकस तसेच हंगामी बागायतीसाठी दर दिले नसल्यास जिरायत शेतजमिनीच्या दिडपट दर खरीप जमिनीस व जिरायत जमिनीच्या 75% दर वरकस जमिनीस विचारात घेणेबाबत सुचना आहेत.

मौजे- रानबांबुळी, ता.कुडाळ येथील जमीनी राष्ट्रीय महामार्ग रुंदीकरणासाठी संपादित होत असून, सदर गाव कुडाळ या तालुक्याचे ठिकाणापासून 17 कि.मी. अंतरावर आहे. सदर गावापासून 2 कि.मी. अंतरावर सिंधुदुर्गनगरी हे जिल्हा मुख्यालय आहे. या गावापासून सिंधुदुर्गनगरी रेल्वेस्टेशनपासून 4 कि.मी. अंतरावर आहे. सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित असून, गोवा या पर्यटन दृष्टया जागतिक महत्व असलेल्या राज्याला लागून आहे. रानबांबुळीपासून सुमारे 37 कि.मी. अंतरावर चिपी विमानतळ होऊ घातलेले आहे. अल्पावधीतच त्याचे काम पूर्ण होणार आहे. तसेच लगतच्या मालवण तालुक्यामध्ये ' समुद्रविश्व प्रकल्प ' नावारुपाला येत आहे. जवळच कुडाळ येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ औद्योगिक प्रकल्प आहेत. व्यापक औद्योगिक क्षमता असून, महामार्ग भोवतालच्या क्षेत्रात येवू घातलेल्या हॉटेल, व्यवसाय, उद्योग धंद्यामुळे महामार्ग लगतच्या सर्व जमिनींना अनन्य साधारण महत्व आले आहे. व या सर्व क्षेत्रातील शेतजमिनी देखील अमर्याद अकृषिक संभावनांच्या क्षमता धारण करतात.

राष्ट्रीय महामार्ग क्र.66 साठी प्रस्तुत संपादित क्षेत्र हे महामार्गाच्या दुतर्फा आहे. जमिनीस व्यापक औद्योगिक व अकृषिक क्षमता आहे. सदर जमिनी या हायवेलगत असल्याने हायवेलगताच्या जमिनीचा दर विचारात घेणे आवश्यक आहे. मौजे- रानबांबुळी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग या गावचे शिघ्रसिद्ध गणक दर ग्रामीण क्षेत्रात विभाग 6 मध्ये मोडत आहे. विभाग 6 मधील मुल्यविभागाच्या माहिती तक्त्यामध्ये हायवेवरील जमिनीचा प्रतिआर दर रु.1,14,000/- एवढा आहे.

मौजे - रानबांबुळी मधील सर्व प्रकारच्या जमिनीसाठी खरीप व वरकस जमिन ग्रुप क्र. 1 व 4 साठी दरांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**<u>मौजे - रानबांबुळी येथील जमिनीचा प्रतीआर दर तक्ता व माहिती.</u>**

| अ.क्र. | जमिनीचा प्रकार | संपादित होणाऱ्या जमीनीचे स.नं./हि.नं. | गटाचे एकुण क्षेत्र हे.आर.) | आकार | ग्रुप क्र. | दर रूपये प्रतिआर |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | जिरायत शेत जमिन | 147/2, 148/0, 149/1, 149/2, 151/1 | -- | 0 ते 1.25 | 1 | 3940 |
| 2 | जिरायत शेत जमिन | 150/2 | -- | 5.01 ते 7.50 | 4 | 6251 |
| 3 | हायवे लगत जमिनी | 147/2, 148/0, 149/1, 149/2, 151/1, 150/2 | -- | -- | -- | 114000 |
| 4 | बिनशेती जमिनी | -- | -- | -- | -- | 101000 |

**13A) खरेदी विक्री प्रमाणे दर :-**

सदरची जमीन राष्ट्रीय महामार्ग क्र.66 चे रस्ता रुंदीकरणासाठी संपादन करण्यात येत आहे. संपादित जमिनीचे मुल्यांकन निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3A अधिसूचना Minishty of Road Transport and Highway Notification New De!hi S.O.3186 (अ) दि.26/11/2015 रोजी प्रसिध्दी केली आहे. मुल्यांकनासाठी दि.26/11/2015 ही तारीख आधारभूत धरण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाकडील पत्र क्र.NHAI/11013/dgm (L.A & Coord) 2015/FTS-417/70689, दि.24/08/2015 व पत्र क्र.संकिर्ण-10/2015/प्र.क्र.133/अ-2, दि.05/10/2015 अन्वये कळविणेत आलेप्रमाणे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 नुसार संपादित करावयाच्या जमिनीसंदर्भात मुल्यांकन करताना नवीन भूसंपादन कायद्यातील फक्त मोबदला परिगणित करण्याबाबतच्या कलम 26 ते 30 च्या तरतूदी लागू असून, उर्वरित कार्यपध्दती ही राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 च्या तरतूदीनुसार करणे अपेक्षित आहे, असे कळविणेत आल्याने सदर तारखेपासूनचे मागील तीन वर्षाचे मौजे- रानबांबुळी या गावाचे खरेदी विक्री व्यवहार सन 2012, 2013 व 2014 या वर्षीचे दुय्यम निबंधक, कुडाळ यांजकडून मागविण्यात आलेले आहेत. सन 2012 या वर्षीचा एकही खरेदी विक्री व्यवहार प्राप्त नाही. मागील तीन वर्षात मौजे- रानबांबुळी या गावी 7 खरेदी विक्री व्यवहार झालेले आहेत. त्यापैकी बिनशेती-3, खरीप/भातशेती-1, वरकस-2 व कलमबाग-1 असे मिळून 7 खरेदी विक्री व्यवहार झाले आहेत.

**खरेदी विक्री व्यवहारांचे विवरण.**

| अ. क्र. | परि.अ. मधील अ.नं. | प्रकार | स.नं./हि.नं. | खरेदी क्षेत्र | आकार | जमिनीची प्रत | विक्रीचा दिनांक | खरेदी किंमत | प्रतिआर दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 561/2013 | खरेदीखत | 66/28<br>66/50 | 0.01.00<br>0.02.50<br>**0.03.50** | 0-33<br>0-09 | खरीप<br>खरीप | 22/3/2013 | 2,80,000/- | 80,000/- |
| 2 | 304/2014 | खरेदीखत | 61ब20/25 | 0.03.84 | - | अकृषिक | 6/2/2014 | 3,40,000/- | 88,542/- |
| 3 | 361/2014 | खरेदीखत | 61/15 | 0.04.00 | 0-02 | वरकस | 13/2/2014 | 3,52,000/- | 88,000/- |
| 4 | 624/2014 | खरेदीखत | 61/3अ | 0.10.00 | - | कलमबाग | 20/3/2014 | 1,50,000/- | 15,000/- |
| 5 | 801/2014 | खरेदीखत | 158/13ब-4 | 0.04.00 | - | अकृषिक | 11/4/2014 | 3,60,000/- | 90,000/- |
| 6 | 1562/2014 | खरेदीखत | 158/9ब-9 | 0.03.40 | - | अकृषिक | 25/7/2014 | 3,00,000/- | 88,235/- |
| 7 | 2403/2014 | खरेदीखत | 61/12-1 | 0.07.00 | - | वरकस | 26/12/2014 | 1,00,000/- | 14,286/- |

वरील प्रमाणे एकूण 7 खरेदी विक्री व्यवहार असून, नवीन भूसंपादन कायदा 2013 मधील कलम 26 ते 30 मधील तरतूदीनुसार प्रतवारी प्रमाणे दर निश्चित करणेसाठी तत्सम

प्रतीच्या खरीप व्यवहारापैकी निम्मे दर विचारात घेवून खरीप प्रतीच्या जमीनीचा दर निश्चित करणेसाठी खालील प्रमाणे दर निश्चित करणेत आला.

**गांव - रानबांबुळी , ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.**

| अ. क्र. | परि.अ. मधील अ.नं. | प्रकार | स.नं./ हि.नं. | खरेदी क्षेत्र | आकार | जमिनीची प्रत | विक्रीचा दिनांक | खरेदी किंमत | प्रतिआर दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 561/2013 | खरेदीखत | 66/28<br>66/50 | 0.01.00<br>0.02.50 | 0-33<br>0-09 | खरीप<br>खरीप | 22/3/2013 | 2,80,000/- | 80,000/- |
| | **एकूण** | | | **0.03.50** | | | | **2,80,000/-** | |

**2,80,000/- ÷ 0.03.50 = 80,000/- प्रतिआर**

वरकस प्रतीचा दर ठरविणेसाठी एकूण 2 खरेदी विक्री व्यवहार उपलब्ध आहेत. पैकी उच्चत्तम किंमतीने झालेले निम्मे खरेदी विक्री व्यवहार विचारात घेवून वरकस जमिनीचा प्रती आर दर खालील प्रमाणे निश्चित करणेत येत आहे.

| अ. क्र. | परि.अ. मधील अ.नं. | प्रकार | स.नं./ हि.नं. | खरेदी क्षेत्र | आकार | जमिनीची प्रत | विक्रीचा दिनांक | खरेदी किंमत | प्रतिआर दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 361/2014 | खरेदीखत | 61/15 | 0.04.00 | 0-02 | वरकस | 13/2/2014 | 3,52,000/- | 88,000/- |

**3,52,000/- ÷ 0.04.00 = 88,000/- प्रतिआर**

संपादित क्षेत्रात अकृषिक व डोंगर बागायत (कलमबाग/काजुबाग) क्षेत्र समाविष्ट नसल्याने सदर खरेदी-विक्री व्यवहार विचारात घेणेत आलेले नाहीत.

प्रस्तुत भूसंपादन प्रकरणी संयुक्त मोजणी पत्रकातील नोंदी पाहता प्रस्तावीत क्षेत्रात पोटखराबा क्षेत्राचा समावेश आहे. संयुक्त मोजणी पत्रकाप्रमाणे **एकूण 0.25.45 हे.आर** एवढे पोटखराबा क्षेत्र आहे. शासन निर्णय क्र.एलक्यूएन/2005प्रक्र/1600-अ-2 दिनांक 04/10/2008 मध्ये त्या त्या क्षेत्रातील जमिनीस जिराईत जमिनीच्या 25% एवढा जमिन दर लागू करावा असे नमूद केले आहे. पोटखराबा जिराईत दराच्या 25% प्रमाणे हिशोबित होणारा जमिन दर खालील प्रमाणे आहे. त्याप्रमाणे निवाडयात समावेश करण्यात आलेला आहे.

| जिराईत दर | जिराइत दराच्या 25% प्रमाणे हिशोबित होणारा दर रू. प्रती आर |
|---|---|
| 53,333/- | 13,333/- |

वरीलप्रमाणे सर्व खरेदी-विक्री व्यवहार विचारात घेवून नविन भूसंपादन कायदा 2013 मधील कलम 26 ते 30 मधील तरतुदीनूसार उच्चत्तम किंमतीचे तत्सम प्रतीचे निम्मे खरेदी-विक्री व्यवहार विचारात घेवून सरासरी विक्री किंमतीच्या आधारे खालीलप्रमाणे दर निश्चित करणेत येत आहे.

**खरेदी विक्री व्यवहार पद्धतीने हिशोबित केलेले दर**

| अ.क्र. | प्रतवारी | प्रतीआर दर |
|---|---|---|
| 1 | खरीप | 80,000/- |
| 2 | वरकस | 88,000/- |
| 3 | पोटखराबा | 13,333/- |

## 13B) शिघ्रसिध्द गणक पध्दतीने येणारा दर -

सह दुय्यम निबंधक वर्ग 2 सिंधुदुर्ग, यांचेकडून 01/01/2015 ते 31/12/2015 या कालावधीचे शिघ्रसिध्द गणकाचे दर व मार्गदर्शक सुची या कार्यालयाकडील पत्र क्र.भूसं/रा.म.मा-66/प्र.क्र.1ते18/07/2015/17,दि.07/07/2015 अन्वये मागविणेत आलेले होते. सह दुय्यम निबंधक, यांनी त्यांचेकडील पत्र क्र. सहदुनिसि/शिघ्रसिध्द गणक/263/2015 दि.12/08/2015 अन्वये शिघ्रसिध्द गणकाचे दर नोंदणी महानिरीक्षक, मुद्रांक नियंत्रक व महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील सन 2015 चे दर प्राप्त झाले. मौजे रानबांबुळी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग हा गाव शिघ्रसिध्द गणक तक्त्यात ग्रामीण क्षेत्रात विभाग 6 मध्ये मोडत आहे. जमिन दर निश्चित करतेवेळी कलम 3 A ची अधिसूचना प्रसिध्द झाली त्यावर्षांच्या शिघ्रसिध्द गणक सूचीप्रमाणे दराचा विचार करणेत यावा. अशी भूसंपादन कायद्यात तरतूद असल्याने सन 2015 चे मुल्यांकन तक्याप्रमाणे विभागमुल्य प्रकारानुसार सदरचा गाव मुल्यविभाग 6 मध्ये मोडत असल्याने हेक्टरी शेतसारा आकारणीनुसार जिराईत जमिनीच्या भातशेती/खरीप जमिनीस दिडपट, वरकस जमिनीस जिराईत जमिनीच्या 75% व जिराईत जमिनीच्या 25% दर पोटखराबा जमिनीस हिशोबित होत आहे. त्यानुसार शिघ्रसिध्द गणकाप्रमाणे संपादनाखालील जमिनीचा दर खालीलप्रमाणे हिशोबित होईल.

**शिघ्रसिध्द गणक दराप्रमाणे निश्चित केलेला दर**

| अ.क्र. | गट क्रमांक | प्रति हेक्टरी शेतसारा | जमिनीचा प्रकार व दर प्रतिआर | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जिरायत | खरीप | वरकस | पोट खराबा | हायवे लगतचे दर | बिनशेती दर |
| 1 | 1 | 0 ते 1.25 | 3940 | 5910 | 2955 | 985 | 114000 | 101000 |
| 2 | 2 | 1.26 ते 2.50 | 5093 | 7640 | 3920 | 1273 | 114000 | 101000 |
| 3 | 3 | 2.51 ते 5.00 | 5292 | 7938 | 3969 | 1323 | 114000 | 101000 |
| 4 | 4 | 5.01 ते 7.50 | 6251 | 9377 | 4688 | 1563 | 114000 | 101000 |
| 5 | 5 | 7.51 ते 10.00 | 8070 | 12105 | 6053 | 2018 | 114000 | 101000 |
| 6 | 6 | 10.01 ते 12.50 | 9356 | 14034 | 7017 | 2339 | 114000 | 101000 |
| 7 | 7 | 12.51 च्या पुढे | 9923 | 14885 | 7442 | 2481 | 114000 | 101000 |

# तुलनात्मक तक्ता

| अ.क्र. | खरेदी विक्री व्यवहार पद्धतीने हिशोबित केलेले प्रती आर दर | | | बिनशेती लगत जमिनीचे दर | शिघ्रसिद्ध पद्धतीने हिशोबित केलेले प्रती आर दर | या दोन्हीपैकी निवाडयात देय्य करणेत आलेला किफायतशीर दर (प्रती आर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | खरीप | वरकस | पोटखराबा | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | 80,000/- | 88,000/- | 13,333/- | 1,01,000/- | 1,14,000/- | 1,14,000/- |

जमिनीचे बाजारमुल्य ठरवितांना The Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act 2013 चे कलम 26 नुसार वरील मुल्यांकनापैकी सर्वाधिक येणारे बाजारमुल्य दर हा निश्चित करणेकरिता मागील 3 वर्षांचे सरासरी खरेदी विक्री व्यवहार व सन 2015 मधील शिघ्रसिध्द गणकाचा दर यांची तुलना केली असता संपादित जमिन ही हायवेलगत व हायवेसाठी संपादित होत आहे. हायवेलगत जमिनीचा दर शिघ्रसिध्द गणकानुसार येणारा 1,14,000/- प्रतिआर हा दर खरेदी विक्री व्यवहार, जिरायत शेतजमिनीचा शिघ्रसिध्द गणकानुसार दर तसेच बिनशेती जमिनीचा दर यापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. संपादित होणा-या जमिनी हायवेलगत असल्याने सदर हायवेलगत दर निवाडयामध्ये दर्शविणे योग्य वाटते. त्यामुळे शिघ्रसिध्द गणकानुसार हायवेलगत जमिनीचा दर्शविलेला दर रु.1,14,000/- हा संपादित जमिनीच्या मुल्यांकनासाठी बाजारमुल्य म्हणून प्रस्तावित करणेत येत आहे.

## संपादित जमिनीचे अंतिम मुल्यांकन.

**भूसंपादन प्रस्ताव क्रमांक 2/2014, गांव - रानबांबुळी, तालुका - कुडाळ**

| अ.क्र. | स.नं./ हि.नं. | संपादित जमिनिचे क्षेत्र | | | | आकार | पैकी 3D अधिसूचने द्वारे प्रसिद्धी क्षेत्र | संपादित जमिनीचा प्रती आर दर | संपादित जमिनीचा गुणांक 2 प्रमाणे प्रती आर दर | एकूण जमिनीची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | खरीप | वरकस | पो.ख. | एकूण | | | | | |
| 1 | 147/2 पै | -- | 0.16.30 | 0.02.00 | 0.18.30 | 0.06 | 0.18.30 | 114000 | 228000 | 4172400 |
| 2 | 148/0 पै | -- | 0.23.60 | 0.21.80 | 0.45.40 | 0.07 | 0.45.40 | 114000 | 228000 | 10351200 |
| 3 | 149/1 | 0.00.30 | -- | -- | 0.00.30 | 0.05 | 0.00.30 | 114000 | 228000 | 68400 |
| 4 | 149/2 | 0.01.50 | -- | -- | 0.01.50 | 0.06 | 0.01.50 | 114000 | 228000 | 342000 |
| 5 | 150/2 पै | 0.11.80 | -- | -- | 0.11.80 | 0.73 | 0.11.80 | 114000 | 228000 | 2690400 |
| 6 | 151/1 पै | -- | 0.07.15 | 0.01.65 | 0.08.80 | 0.02 | 0.08.80 | 114000 | 228000 | 2006400 |
| | एकूण | 0.13.60 | 47.05 | 0.25.45 | 0.86.10 | 0.99 | 0.86.10 | | | 19630800 |

## 14) फळझाडे मुल्यांकन -

प्रस्तूत प्रकरणी झालेल्या संयुक्त मोजणी नुसार त्यामध्ये समाविष्ट असलेल्या फळझाडांचे जागेवरील वस्तुस्थितीनुसार मुल्यांकन करून मिळणेकरीता या कार्यालयाकडील पत्र क्र.उविअ/भूसं/रा.म.मा.क्र.66/मुल्यांकने/05/2016, दि.05/05/2016 अन्वये तालुका कृषी अधिकारी यांजकडे प्रस्ताव पाठविणेत आला होता. मौजे-रानबांबुळी, ता. कुडाळ या गावच्या संपादीत होणाऱ्या जमिनीचे उपविभागीय कृषी अधिकारी, सावंतवाडी यांचेकडील पत्र जा.क्र./उविकृसा/तंत्र/मुल्यांकन-66/1410/2016, दि.13/07/2016 अन्वये प्राप्त झाले आहे. संयुक्त मोजणी पत्रकातील फळझाडांच्या नोंदी व मुल्यांकन पत्रकातील फळझाडांच्या नोंदींची पडताळणी केली असता, तफावती आढळून आलेल्या होत्या. त्यानुसार या कार्यालयाकडील पत्र क्र. उविअ/भूसं/ रा.म.मा.क्र.66/मुल्यांकन अहवाल/8/2016, दि.12/08/2016 अन्वये त्रुटींची पूर्ततेसाठी कळविणेत आले होते. त्यानुसार त्रुटी पूर्तता करुन मुल्यांकन अहवाल त्यांचे कार्यालयाकडील पत्र जा.क्र./उविकृअसा/तंत्र/विस्तार/फ.मु./1597/2016, दि.03/09/2016 अन्वये या कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहे. प्राप्त मुल्यांकनानुसार संयुक्त मोजणी पत्रकातील फळझाडांच्या नोंदी व सदरचा मुल्यांकन अहवालातील नोंदी आणि त्यातील तज्ञ ॲथॉरीटी म्हणून उपविभागीय कृषी अधिकारी, सावंतवाडी यांनी सदरचे मुल्यांकन केलेले असल्याने ते निवाडयामध्ये स्विकृत करण्यात येत आहे. प्राप्त झालेल्या मुल्यांकनानुसार एकूण रक्कम **रू.1,92,581.30** एवढे मुल्यांकन आहे.

| अ.क्र. | स.नं./हि.नं./ गट नंबर | संपादन येणाऱ्या फळझाडांची संख्या | | | | फळझाडांची मुल्यांकन अहवालाप्रमाणे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संयुक्त मोजणी पत्रका प्रमाणे | | फळ विभागाच्या मुल्यांकन अहवालाप्रमाणे | | |
| | | झाडांचा प्रकार | संख्या | झाडांचा प्रकार | संख्या | |
| 1 | 147/2 पै | आंबा | 5 | आंबा | 5 | 1,33,421.80 |
| | | जांभुळ | 1 | जांभुळ | 1 | 11,374.04 |
| | | काजु | 1 | काजु | 1 | 1,137.37 |
| | | चारोळी | 3 | चारोळी | 3 | 3,107.70 |
| | | | | | | **1,49,040.91** |
| 2 | 148/0 पै | कोकम | 1 | कोकम | 1 | 13,850.50 |
| | | काजु | 1 | काजु | 1 | 671.08 |
| | | चारोळी | 2 | चारोळी | 2 | 2,261.14 |
| | | आंबा | 1 | आंबा | 1 | 26,757.67 |
| | | | | | | **43,540.39** |
| | एकूण रक्कम | | | | | **1,92,581.30** |

### 15) वनझाडे मुल्यांकन -

प्रस्तूत प्रकरणी झालेल्या संयुक्त मोजणी नुसार त्यामध्ये समाविष्ट असलेल्या वनझाडांचे जागेवरील वस्तुस्थितीनुसार मुल्यांकन करून मिळणेकरीता या कार्यालयाकडील पत्र क्र.उविअ/भूसं/रा.म.मा.क्र.66/मुल्यांकने/05/2016, दि.05/05/2016 अन्वये वनक्षेत्रपाल, कडावल यांजकडे प्रस्ताव पाठविणेत आला होता. मौजे- रानबांबुळी, ता. कुडाळ या गावच्या संपादीत होणाऱ्या जमिनीचे वनक्षेत्रपाल, कडावल यांचेकडील पत्र क्रमांक/ब/मुल्यां/209/2016-17, दि.14/07/2016 अन्वये प्राप्त झाले आहे. प्राप्त मुल्यांकन अहवालानुसार संयुक्त मोजणी पत्रकातील वनझाडांच्या नोंदी व सदरचा मुल्यांकन अहवालातील नोंदी जुळत असल्याने आणि त्यातील तज्ञ ॲथॉरीटी म्हणून उप वनसंरक्षक, वन विभाग, सावंतवाडी यांनी सदरचे मुल्यांकन केलेले असल्यामुळे ते निवाडयामध्ये स्विकृत करण्यात येत आहे. प्राप्त झालेल्या मुल्यांकनानुसार **एकूण रक्कम रूपये रु.29,912/-** एवढे मुल्यांकन आहे.

| अ.क्र. | स.नं./हि.नं. | संपादन येणाऱ्या वनझाडांची संख्या | | | | वनझाडांची मुल्यांकन अहवालाप्रमाणे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संयुक्त मोजणी पत्रकाप्रमाणे | | वन विभागाच्या मुल्यांकन अहवालाप्रमाणे | | |
| | | झाडांचा प्रकार | संख्या | झाडांचा प्रकार | संख्या | |
| 1 | 147/2 पै | खैर | 2 | खैर | 2 | 3059.00 |
| | | ऐन | 13 | ऐन | 13 | |
| | | मोय | 3 | मोय | 3 | |
| | | किंजळ | 2 | किंजळ | 2 | |
| | | सावर | 1 | सावर | 1 | |
| | | कटक | 1 | कटक | 1 | |
| | | वड | 2 | वड | 2 | |
| 2 | 148/0 पै | आकेशिया | 7 | आकेशिया | 7 | 11,228.00 |
| | | मोय | 1 | मोय | 1 | |
| | | ऐन | 18 | ऐन | 18 | |
| | | किंजळ | 4 | किंजळ | 4 | |
| | | फणसी | 1 | फणसी | 1 | |
| | | नराम | 1 | नराम | 1 | |
| | | कुंभा | 2 | कुंभा | 2 | |
| | | शिरस | 4 | शिरस | 4 | |
| | | साग | 1 | साग | 1 | |
| | | वट | 1 | वट | 1 | |
| | | हेळा | 1 | हेळा | 1 | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 150/2 पै | मोय<br>ऐन<br>पळस<br>सावर<br>शिरस<br>किंजळ<br>कुंभा | 4<br>5<br>1<br>2<br>1<br>1<br>1 | मोय<br>ऐन<br>पळस<br>सावर<br>शिरस<br>किंजळ<br>कुंभा | 4<br>5<br>1<br>2<br>1<br>1<br>1 | 2,512.00 |
| 4 | 151/1 पै | कुंभा<br>शिरस<br>ऐन<br>मोय<br>हेळा<br>आमण<br>किंजळ<br>खैर | 1<br>2<br>13<br>3<br>1<br>1<br>2<br>1 | कुंभा<br>शिरस<br>ऐन<br>मोय<br>हेळा<br>आमण<br>किंजळ<br>खैर | 1<br>2<br>13<br>3<br>1<br>1<br>2<br>1 | 13,113.00 |
| | | | | | **एकूण रक्कम** | **29,912.00** |

## 16) बांधकामे मुल्यांकन -

संपादीत जमिनीत बांधकामे नाहीत. त्यामुळे मुल्यांकन करणेचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच संपादित जमिनीमध्ये विहिरी, विंधन विहिरी नाहीत.

## 17) धार्मिक मालमत्ता :-

संपादीत जमिनीमध्ये मौजे रानबांबुळी, ता.कुडाळ येथील धार्मिक मालमत्ता/ जमिन संपादित होत नाही.

| अ.क्र. | मौजे | अवार्ड प्रपत्र ई अ.क. | मालमत्तेचा प्रकार | स.नं. | संपादीत क्षेत्र | स्टेटमेंट ई प्रमाणे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| **नि रं क** | | | | | | |

## 18) शासकीय जमीन :-

सदर प्रकरणातील मौजे रानबांबुळी, ता.कुडाळ येथील संपादीत होणाऱ्या जमिनी सरकारी मालकी दर्शविलेली बाब सं.मो. अहवालाप्रमाणे संपादित होत नाही.

| अ.क्र. | स.नं. | तपशील | क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|
| **नि रं क** | | | | |

## 19) पोटखराबा जमिनीचे मुल्यांकन :-

अंतिम निवाडयात प्रपत्र ई प्रमाणे संपादनाखालील जमिनीमध्ये येणाऱ्या पोटखराबा क्षेत्रासाठी शासन महसूल व वनविभागाचे निर्णय क्रमांक एलक्यूएन/2005/प्र.क्र./1600-अ-2 दि.04/10/2008 नुसार जिरायत दराच्या 25% दर देय करणेत आला आहे. पोटखराबा जमिनी अभिलेख व स्थळ पहाणीनुसार निश्चित करणेत आलेल्या आहेत.

## 20) कुळ :-

प्रस्तावीत क्षेत्राचे 7/12 उतारे पहाता जमिनीत कुळे व मालक आहेत. शासन निर्णयाप्रमाणे जमिन मालकास 40% व कुळास 60% याप्रमाणे संविभाजन पत्रात रक्कम देयय् करणेत येईल.

## 21) संपादित जमिनीचा ताबा :-

संपादित जमिनीचा ताबा संपादन संस्थेने घेतलेला नाही. त्या जमिनीचा ताबा अंतिम निवाडयानंतर संपादीत संस्थेस ताबा देण्याची कार्यवाही कलम 3H (1) प्रमाणे करणेत येईल.

## 22) 100% दिलासा रक्कम :-

भूसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकारी व स्थानांतरण पुन:स्थापना आणि पुनर्वसन अधिनियम 2013 मधील कलम 30(1) नुसार देय संपादन मोबदला रकमेवर 100% दिलासा रक्कम हिशोबित करून देय करणेत आलेली आहे.

## 23) संपादन क्षेत्रासाठी बाजार मुल्यांचा गुणक घटक (Multiplier Factors) :-

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार/अ दि. 26 मे, 2015 अन्वये उक्त अनुसूचीच्या नोंद (2) व (3) मध्ये अनुक्रमे ग्रामीण क्षेत्राच्या बाबतीत ज्या घटकाद्वारे बाजार मुल्य गुणले जाणार आहेत ते घटक, महाराष्ट्र शासनाने अधिसूचीत करणेत आलेले आहे. भारत सरकार यांजकडील पत्र क्र.13011/04/2015-LRD, दि.09/02/2016 व भारत सरकार M.O.R.T. राष्ट्रीय महामार्ग यांजकडील परिपत्रक क्रमांक नंबर RW/MUM/11016/1/2015-16/684, दि.13/04/2016 अन्वये 2.00 गुणांक निश्चित करण्याचे कळविणेत आलेले आहे. त्यानुसार मौजे रानबांबुळी, ता. कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग मधील संपादित क्षेत्र ग्रामीण क्षेत्र असल्यामुळे उक्त अधिसूचनेमधील अनुसूचीमध्ये ग्रामीण क्षेत्रासाठी गुणांक 2.00 वाढ देवून येणारा दर निवाडयामध्ये लागू केलेला आहे.

## 24) अतिरिक्त घटक मोबदला :-

भूसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुन:स्थापना आणि पुनर्वसन अधिनियम 2013 मधील कलम 30 (3) नुसार प्रस्तूत भूसंपादन प्रकरणी कलम 3(A) अधिसूचना भारत सरकार नवी दिल्ली राजपत्र असाधारण भाग II खंड 3 - उपखंड (ii) अन्वये दि.26/11/2015 मध्ये प्रसिद्ध झालेली असून, अंतिम प्रसिद्धी 19/12/2015 रोजी झालेली आहे. त्यामुळे उपरोक्त नवीन भूसंपादन अधिनियम 2013 मधील कलम 30(3) व महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचेकडील पत्र क्र.संकिर्ण-03/2016/सं.क्र-270/अ-2, दि.28 ऑक्टोंबर,2016 नुसार प्रसिद्धीच्या दिनांकापासून निवाडयाच्या तारखेपर्यंत म्हणजेच 19/12/2015 ते 30/11/2016 पर्यंत एकूण 347 दिवस जमिनीच्या किंमतीत शासनाने निश्चित केलेल्या गुणांकाने गुणुन येणा-या बाजार मुल्यांवर 12% अतिरिक्त घटकांची रक्कम हिशोबित करणेत आलेली आहे.

## 25) मालकी हक्क :-

संपादीत होणाऱ्या जमिनीची मालकी निश्चित करण्यासाठी संबंधीत जमिनीच्या अधिकार अभिलेखातील (7/12) नोंदी ग्राहय धरण्यात आल्या आहेत. मालकी हक्क व नुकसान भरपाई बाबत काही हरकती निर्माण झाल्यास त्यावर राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 कलम 3 H (4) प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. उक्त अधिनियमाचे कलम 3D व संयुक्त मोजणीचे वेळी मालकी हक्काबाबतचे दस्त ऐवज विचारात घेण्यात आले आहेत. तथापि, काही मालमत्ते संदर्भात मालकी हक्क शाबितीचा वाद उद्भवल्यास मालकी हक्काबाबत सक्षम न्यायालय जो आदेश देईल, त्या आदेशानुसार संबंधितांना नुकसान भरपाई वाटप करण्यात येईल. संपादित जमिन ही खुद्द मालकीची आहे ज्यांना नुकसान भरपाई वाटप केलेले आहे त्यांच्याकडून संपादित जमिनीचा ताबा घेण्यात येवून त्यांच्या मालकी हक्कामधुन 7/12 उताऱ्यावरून संपादीत क्षेत्र कमी करून सदरचे संपादीत क्षेत्र केंद्र शासनाकडे (भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण) वर्ग करण्यात यावे. त्याबाबत स्वतंत्र आदेश काढण्यात येतील व तशी नोंद 7/12 उताऱ्यावर हितसंबधीतांचे मालकी हक्कात घेण्यात यावी.

सदरील जमीनीवर बँकाचे कर्ज, तारण जप्ती इत्यादी आदेश नोंद केलेले आहेत व अशा संस्थांनी वसुली संदर्भात आपले दावे दाखल केलेले आहेत, अशा जमिनीची नुकसान भरपाई वसुली पात्र रक्कम प्रथम प्राधान्याने वसुल केली जाईल याची उपाययोजना करण्यात येईल.

ज्या जमिनींचे 7/12 उताऱ्यावर बेकायदेशीर खरेदी-विक्री व्यवहार शर्तभंग इत्यादी नोंदी आहेत, अशा जमिनीची नुकसान भरपाई संबंधित तहसिलदार अथवा सक्षम प्राधिकारी यांचेकडील ना हरकत प्रमाणपत्र अथवा अशा नोंद कमी झाल्यानंतर नुकसान भरपाई देण्यात यावी. नवीन शर्तीच्या जमिनीची नुकसान भरपाई शासनाचे प्रचलित नियमाप्रमाणे नजराणा रक्कम वसुल करून उर्वरित रकमेचे वाटप करावे व कपात केलेली रक्कम शासकीय कोषागारात जमा करावी. तसेच इनाम जमिनीबाबत मावेजा वाटप करता येणार नाही. नियमाप्रमाणे आवश्यकती कार्यवाही करावी.

संयुक्त मोजणीप्रमाणे संपादित क्षेत्र खाजगी व्यक्तीने धारण केले आहे. या बाबत उपअधिक्षक, भूमी अभिलेख व अधिकार अभिलेख यांच्याकडून खात्री करण्यात आली आहे. तथापि, संपादन पैकी काही क्षेत्र यापूर्वी महामार्ग अथवा इतर शासकीय कारणासाठी संपादीत झालेली आहे, याबाबत कोणताही पुरावा उपलब्ध झाला तरी देखील आज रोजी अशा जमिनी संदर्भात मोबदला वाटप करण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे अशा जमिनींचे बाबतीत मोबदला वाटप संबंधित जमीन धारकाने संपादनाबाबतची माहिती न देता स्विकारल्यास ते संबंधिताकडून वसुल करण्यास पात्र राहील.

## 26) आस्थापना सेवा शुल्क 3% प्रमाणे आकारणी :-

सदर प्रकरण राष्ट्रीय महामार्ग, भारत सरकार यांचे असलेमुळे संचिकेत 3% आस्थापना रक्कमेची आकारणी निवाडयात करणेत आलेली आहे. (महाराष्ट्र शासन राजपत्र आसाधारण अधिसूचना क्र.49, दि.19/03/2014 मधील तरतुदीनुसार )

## 27) सोयी सुविधा खर्च 3% प्रमाणे आकारणी :-

सदर प्रकरण राष्ट्रीय महामार्ग, भारत सरकार यांचे असलेमुळे संचिकेत 3% सुविधा खर्च शुल्क रक्कमेची आकारणी निवाडयात करणेत आलेली आहे. (महाराष्ट्र शासन राजपत्र आसाधारण अधिसूचना क्र.49, दि.19/03/2014 मधील तरतुदीनुसार )

## 28) नुकसान भरपाई :-

या निवाडयाच्या निवाडा पत्रकामध्ये (प्रपत्र - ई मध्ये) नमुद केल्याप्रमाणे संपादित क्षेत्राची गट/स.नं. निहाय नुकसान भरपाई खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| अ | **संपादित निवाडा जमिनीचे एकूण क्षेत्र (हे.आर.)** | **0.86.10** |
| ब | **जमिनीची मुळ किंमत कलम 26(1) प्रमाणे**<br>जिरायत, बागायत, हंगामी बागायत, हायवेवरील, अकृषिक, संभाव्य अकृषिक इ. प्रमाणे रक्कम | 98,15,400.00 |
| क | **जमिनीची मुळ किंमत कलम 26(2) गुणक 2.00 प्रमाणे**<br>जिरायत, बागायत, हंगामी बागायत, हायवेवरील, अकृषिक, संभाव्य अकृषिक इ. प्रमाणे रक्कम | 98,15,400.00 |
| | **एकूण (ब + क)** | **1,96,30,800.00** |
| 1 | बांधकामाचे मुल्य:- घर/गोठा/दुकाने/मंदिर/पाण्याचे हौद/टाकी इत्यादी | --- |
| 2 | विहीरींचे मुल्यांकन | --- |
| 3 | विंधन विहीरींचे मुल्यांकन | --- |
| 4 | वनझाडांचे मुल्यांकन | 29,912.00 |
| 5 | फळझाडांचे मुल्यांकन | 1,92,581.30 |
| | **एकूण - (1 ते 5)** | **2,22,493.30** |
| 6 | कलम 27 प्रमाणे एकूण रक्कम | **1,98,53,293.30** |
| 7 | 100% सोलेशियम (दिलासा रक्कम) | 1,98,53,293.30 |
| 8 | 12% रक्कम कलम 30(3) प्रमाणे (कलम 3A पासून निवाडा दिनांकापर्यंत दि.19/12/2015 पासून दि.30/11/2016 पर्यंत म्हणजे 347 दिवस) | 22,39,524.69 |
| | **एकूण- (6 ते 8)** | **4,19,46,111.29** |
| | **पुर्णांकात रक्कम रुपये** | **4,19,46,111.00** |
| | **म.शा.रा.पत्र.क्र.49, दिनांक 19/03/2014 मधील तरतूदी नुसार** | |
| 9 | 3% आस्थापना खर्च रक्कम राज्यशासनास जमा करणेसाठी | 12,58,383.00 |
| 10 | 3% सोयी सुविधा खर्चाची रक्कम भूसंपादन अधिकारी यांच्या खात्यामध्ये जमा करण्यासाठी | 12,58,383.00 |
| | **एकूण बेरीज** | **4,44,62,877.00** |

**सोबत निवाडा प्रपत्रक (अक्षरी रक्कम रूपये:- चार कोटी चव्वेचाळीस लाख बासष्ठ हजार आठशे सत्याहत्तर मात्र)**

**29) मोबदला वाटप प्रक्रिया :-**

याप्रमाणे निर्धारित करणेत आलेली निवाडा रक्कम राष्ट्रीय महामार्ग कायदयाच्या कलम 3 H (1) मधील तरतूदीप्रमाणे केंद्रशासनाद्वारे सक्षम प्राधिकारी यांचेकडे जमा करावी. याप्रमाणे निवाडा रक्कम सक्षम प्राधिकारी यांचेकडे जमा केल्यावर उक्त अधिनियमाच्या कलम 3 H (2) अन्वये सक्षम प्राधिकारी केंद्रशासनाच्या वतीने या निवाडयाद्वारे संपादित करण्यात आलेल्या क्षेत्रातील पात्र हितसंबंधित व्यक्तिंना त्याच्या क्षेत्रा व हिश्यानुसार रक्कमेचे वाटप करतील व त्यांचेकडुन संपादित क्षेत्राचा ताबा घेतील. भूसंपादन मोबदला रक्कम वाटप करताना संपादित होणाऱ्या क्षेत्राच्या मालकीबद्दल अथवा मोबदला रक्कमेतील हिश्याबद्दल वाद निर्माण झाल्यास प्रमुख जिल्हा न्यायालय (The principal civil court of original jurisdiction within the limits of whose jurisdicition the land is situated) यांचकडे उक्त अधिनियमाच्या कलम 3 H (4) नुसार त्यांचे निर्णयासाठी मोबदला रक्कम भरता येईल.

**30) जमीनीचा ताबा :-**

राष्ट्रीय महामार्ग अधिनियमाच्या कलम 3 E (1) मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी संपादित जमिनीच्या हितसंबंधितास हा निवाडा घोषित केल्यावर मोबदला रक्कम स्विकारणेसाठी व त्याचवेळी संपादित मिळकतीचा ताबा केंद्रशासनास हस्तांतरीत करणेकरिता लेखी नोटीसीद्वारे कळवतील. अशा नोटीसीची बजावणी झालेवर एकूण 60 दिवसाच्या कालावधीत जर हितसंबंधित व्यक्तिनी ताबा हस्तांवर केला नाही तर उक्त अधिनियमाच्या कलम 3 E (2) प्रमाणे जिल्हाधिकारी यांना ताबा प्राप्त करणेकरीता सक्षम प्राधिकारी विनंती करतील व जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सक्षम प्राधिकारी यांना अथवा त्यांचेद्वारे प्राधिकृत व्यक्तीस ताबा हस्तांतरीत केला जाईल.

**31) जमिनीचा वापर :-**

संपादन करण्यात आलेली जमिन ही राष्ट्रीय महामार्गाच्या रूंदीकरण या सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्यात आलेली आहे. या संपादनाखालील ज्या जमिनींना वनसंबधित कायद्याच्या तरतुदी लागू आहेत अथवा इतर कायद्यांच्या किंवा न्यायालयाच्या आदेशाद्वारे वापरातील बदलास निर्बंध लागू आहेत. या बाबतीत भूसंपादनानंतर अनुज्ञेय वापर सुरू करण्यापूर्वी वनविभाग अथवा त्या-त्या परिस्थितीतील निर्बंध असणाऱ्या विभागातील सक्षम स्तरावरून वापरातील निर्बंधाबाबत परवानगी घेवूनच संपादित करण्यात आलेल्या अशा मिळकती हया ज्या प्रयोजनासाठी संपादित केल्या आहेत

त्या प्रयोजनसाठी वापर करण्यास पात्र ठरतील. अशा प्रकरणांमध्ये सक्षम स्तरावरून अनुज्ञेय वापरात बदल करून घेण्याची जबाबदारी संपुर्णतः संपादन संस्था म्हणजेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांची राहील म्हणजेच या भुसंपादन प्रक्रियेद्वारे संपादित जमिनींची केवळ मालकी (Title) संपादन संस्थेकडे कायदेशिरपणे हस्तांतरीत केली जात आहे. व त्याच्या वापरादरम्यान वनसंवर्धन कायद्याच्या तरतूदींचा भंग होणार नाही यांची जबाबदारी संपादन संस्थेची राहील.

## 32) विश्लेषण :-

ज्याअर्थी वरील परिच्छेद क्रमांक 28 मध्ये **मौजे रानबांबुळी, ता. कुडाळ** येथील संपादनाचे क्षेत्र व त्याअनुषंगाने कायदयातील तरतुदी विचारात घेता परिगणित करण्यात आलेली जमिन व तिच्याशी निगडीत जंगलीझाडे व फळझाडे यांच्या मोबदल्याचा एकत्रित सारांश दर्शविण्यात आलेला आहे. तसेच या निवाडयासोबत जोडलेल्या निवाडा पत्रकामध्ये संपादित होणाऱ्या सर्व्हे नंबर / गट नंबर निहाय विस्तृतपणे अनुज्ञेय मोबदल्याचा तपशिल विषद करण्यात आलेला आहे.

त्याअर्थी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 च्या कलम 3 G (1) प्रमाणे सक्षम प्राधिकारी म्हणून केंद्रशासनाने संदर्भिय क्रमांक 1 नुसार दिलेल्या अधिकारांचा वापर करून उक्त कायद्याच्या कलम 3 D नुसार **मौजे रानबांबुळी, ता. कुडाळ** येथील संपादित करण्यात आलेल्या मिळकतींचा निवाडा या आदेशाद्वारे घोषित झाला आहे असे जाहिर करण्यात येत आहे. ज्याअर्थी हा निवाडा घोषित करण्यात आला आहे त्याअनुषंगाने उक्त अधिनियमाच्या कलम 3 (E) व 3 (H) प्रमाणे सर्व हितसंबंधीतांस नोटीसा देण्यात याव्यात. ज्याअर्थी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 च्या कलम 3G प्रमाणे हा निवाडा जाहिर झाला असुन अंतिमतः संपादित जमिनीवरील सर्व हितसंबधी यांचे/ खातेदारांचे सर्व हक्क संपुष्टात येवून ही मिळकत त्या मिळकतीवर असलेल्या सर्व झाडे, इतर मालमत्तांसह तसेच संपुर्ण बोजा विरहित व भारमुक्त (Free From All Encumbrances) होऊन केंद्र शासनाच्या सडक व परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांचे नांवे निहित करणेत येत आहे. तसेच ज्या अर्थी या निवाडयाद्वारे संपादित जमिन ही सर्व भार मुक्त होऊन केंन्द्र शासनाचे वरील मंत्रालयाचे नांवे विहित करणेत आली आहे. त्याअर्थी सदर जमिनींच्या आज रोजी पर्यंत अनुज्ञेय असलेल्या सर्व प्रकारचा जमिन महसूल कमी करणेची कार्यवाही करणेचा म्हणजेच सारा माफीचा आदेश देखील याद्वारे देण्यात येत आहे.

## आदेश

यादवारे जाहिर करण्यात येत आहे की,

1) **मौजे-रानबांबुळी, ता. कुडाळ** जिल्हा सिंधुदुर्ग येथील राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, 1956 चे कलम 3D अंतर्गत अधिसूचित एकुण **0.86.10 हे.आर.** एवढे क्षेत्र उक्त अधिनियमाच्या कलम 3G नुसार निर्धारित करण्यात आलेल्या रक्कम **रु.4,44,62,877.00 (चार कोटी चव्वेचाळीस लाख बासष्ठ हजार आठशे सत्याहत्तर मात्र)** एवढया मोबदल्याच्या विनिमयात अंतिमत संपादित करणेत आले आहे.
2) सर्व खातेदारांस/ हितसंबधीयास उक्त अधिनियमाच्या कलम 3E व 3H नुसार लेखी नोटीसा देवून याबाबत कळविणेत यावे.
3) एकुण निवाडयात नमुद आस्थापना रक्कम **रू.12,58,383.00 (बारा लाख अठ्ठावन्न हजार तीनशे त्रयाऐंशी मात्र )** शुल्क सक्षम प्राधिकारी यांनी शासनास जमा करावे.
4) निवाडयाच्या रक्कमेच्या एकूण 3 टक्के सोई सुविधा शुल्क रक्कम **रू.12,58,383.00 (बारा लाख अठ्ठावन्न हजार तीनशे त्रयाऐंशी मात्र )** सक्षम प्राधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांच्या खात्यात जमा करावी.
5) या निवाडयाद्वारे घोषित क्षेत्राच्या अधिकार अभिलेखात भोगवटादार सदरी संपादन संस्था म्हणजेच सडक व परिवहन मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचे नांवे संपादित क्षेत्रापुरते दाखल करण्यात यावे.
6) उक्त अधिनियमाच्या कलम 3 E व 3 H नुसार पुढील नोटीसा प्रक्रिया पुर्ण केल्यावर म्हणजेच भुसंपादन मोबदला देवू केल्यावर (offer) वितरण (Disburesement) आणि कायद्यात व त्या अनुषंगाने या निवाडयात निर्दिष्ट ताबा प्रकिया पुर्ण केलेवर, सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयामार्फत **मौजे रानबांबुळी, ता. कुडाळ** येथील उक्त अधिनियमाचे कलम 3A व 3D नुसार प्रसिद्ध करणेत आलेल्या अधिसुचना या घोषित निवाडयाची प्रत आणि विधीवत घेण्यात आलेल्या ताबे पावत्यांच्या सह कमी जास्त पत्रक करणेकामी उपअधिक्षक भूमि अभिलेख यांनी कमी जास्त पत्रक पारीत करून पुढील कार्यवाहीसाठी क्षेत्रीय महसुल विभागाकडे सादर करावे. कमी जास्त पत्रकाचा अधिकार अभिलेखात अमंल दिल्यावर गांव नमुना नं.7/12 संपादन संस्थेस सशुल्क उपलब्ध करून देण्याची जबाबदारी क्षेत्रीय महसुल यंत्रणेची राहील.

निवाडा पत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रत्येक जमिनीची नुकसान भरपाई संबंधीतास मालकी हक्क व इतर आवश्यक बाबी तपासून अदा करावी. नुकसान भरपाई वाटप व जमिनीचा ताबा घेण्यासाठी सर्व संबंधीतांना वैयक्तीक नोटीसा कलम 3(E) व 3(H)

अन्वये देण्यात याव्यात व जमिनीचा कायदेशीर ताबा राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 मधील तरतूदीनुसार सक्षम प्रधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल) कुडाळ यांजकडे अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडे देण्यात यावा असा आदेश करण्यात येत आहे. अंतिम निवाडा राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 कलम 3 G (1) अन्वये सक्षम प्राधिकारी म्हणून प्राप्त झालेल्या अधिकारानुसार दिनांक 30/11/2016 रोजी देण्यात येत आहे.

ठिकाण :- कुडाळ
दिनांक :- ३०/11/2016.

( विकास सुर्यवंशी )
सक्षम प्राधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ